राज्य निर्यात पुरस्कार वितरणाच्या अनुषंगाने अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : निर्यात-२०२५/प्र.क्र.१४४/उद्योग-७**
मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- १५/०६/२०२६

**वाचा :-** १) उद्योग आणि कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक क्रमांक आयडीएम-१०७२/१६५१३-आयएनडी-I (B), दिनांक ०३/०४/१९७२.

२) उद्योग आणि कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक आयडीएम-१०७३/२७५४५-आयएनडी-आय (ए), दिनांक ०३/०६/१९७३.

३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक EXP-१००२/AN.१२१/IND-१२, दिनांक २३/०९/२००२.

४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक इएक्सपी-१००२/प्र.क्र.२२१/उद्योग-१२, दिनांक २०/०१/२००३.

५) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्रमांक निर्यात-२०२३/प्र.क्र.१३५/उद्योग-७, दिनांक २२/११/२०२३.

६) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/राज्य उत्कृष्ट निर्यात पुरस्कार/सुधारित प्रस्ताव/२०२५/A-२७२, दिनांक १३/०३/२०२५.

७) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/राज्य उत्कृष्ट निर्यात पुरस्कार/सुधारित प्रस्ताव/२०२५/A-५७७, दिनांक ०९/०६/२०२५.

८) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/राज्य उत्कृष्ट निर्यात पुरस्कार/सुधारित प्रस्ताव/२०२५/A-८९१, दिनांक १२/०९/२०२५.

**प्रस्तावना:-**

राज्यातील निर्यातदारांना त्यांनी केलेल्या निर्यात कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक होवून त्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने त्यांच्या निर्यातीच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मान चिन्हे व गुणवत्ता प्रमाणपत्रे समारंभपूर्वक देण्याची योजना सन १९७२ पासून सुरू आहे. त्यामध्ये दिनांक ०५/०७/१९७३ व दिनांक २३/०९/२००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली होती. सदर पुरस्कार आकर्षक व दर्जेदार होण्याकरीता निर्यातदारांच्या वर्गवारीमध्ये बदल करणे, प्रवर्गनिहाय पुरस्काराची संख्या कमी करणे, पुरस्काराची व्याप्ती तसेच पुरस्काराचे स्वरुप बदलणे इत्यादी संदर्भात सुधारणा करून राज्य निर्यात पुरस्काराबाबतची सर्वसमावेशक कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत उद्योग संचालनालयाकडून संदर्भाधीन पत्रांन्वये प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच राज्यातील नोंदणीकृत निर्यातदारांच्या गुणवत्तेची निर्यात कामगिरी ओळखून त्यांचे कौतुक करणे तसेच भविष्यात चांगल्या आणि उच्च निर्यात कामगिरीसाठी त्यांना सन्मानचिन्ह अथवा धनादेशाच्या स्वरुपात प्रोत्साहन देण्याबाबतची तरतूद दिनांक २२/११/२०२३ अन्वये निर्गमित महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण-२०२३ मध्ये करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने राज्य निर्यात पुरस्कार वितरणाच्या अनुषंगाने अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील निर्यातदारांनी केलेल्या निर्यातीबाबतच्या उत्कृष्ट कामगिरीकरीता प्रोत्साहन देऊन तसेच भविष्यात त्यांच्याकडून निर्यातीची अधिक चांगली कामगिरी होऊन राज्यातील निर्यात प्रचालनास चालना देण्याकरीता राज्यातील उत्कृष्ट निर्यातदारांना पुरस्कार देण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीमध्ये खालीलप्रमाणे नमूद सुधारणा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

**२. राज्यातील नोंदणीकृत निर्यातदारांच्या खालील प्रवर्गातील घटक राज्य निर्यात पुरस्कारासाठी पात्र असतील:-**

i. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम उत्पादक निर्यातदार:-
   - क) सूक्ष्म आणि लघु उपक्रम उत्पादक निर्यातदार (ज्यांचे घटक राज्यात स्थापित आहेत)
   - ख) मध्यम उपक्रम उत्पादक निर्यातदार (ज्यांचे घटक राज्यात स्थापित आहेत)

ii. व्यापारी निर्यातदार/निर्यात गृह(Export House)/व्यापार गृह(Trading House) (ज्यांचे मुख्य कार्यालय राज्यात स्थापित आहे)

iii. सेवा पुरवठादार/सेवा निर्यातदार

iv. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम उत्पादक निर्यातदार (सामाजिक प्रवर्गानुसार):-
   - क) महिला
   - ख) अनुसूचित जाती
   - ग) अनुसूचित जमाती

v. बिगर अभियांत्रिकी (नॉन-इंजिनिअरिंग,) एक जिल्हा एक उत्पादन (ओडीओपी) आणि भौगोलिक मानांकन (जीआय) उत्पादक निर्यातदार

vi. सर्वोत्कृष्ट निर्यातिभिमुख विशिष्ट प्रकल्प (EOSP)/निर्यातीभिमुख औद्योगिक उद्याने (EOIP)/विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ)

vii. संस्थात्मक पुरस्कार
   - अ . सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्याकरीता पुरस्कार
   - ब . सर्वोत्कृष्ट जिल्हा निर्यात कृती आराखडा (DEAP)
   - क . सर्वोत्कृष्ट निर्यात प्रोत्साहन परिषद (EPC)

**टीप:**

- अनुसूचित जाती/जमातीं प्रवर्गासाठी पात्रता दि. ११/०२/२०१६ रोजी जाहीर करण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती सामाजिक प्रवर्गासाठी प्रोत्साहन धोरणामध्ये परिभाषित केल्याप्रमाणे असेल.
- महिला उद्योजक प्रवर्गासाठी पात्रता दि. १४/१२/२०१७ रोजी जाहीर करण्यात आलेल्या महिला उद्योजकांसाठीच्या विशेष धोरणात परिभाषित केल्याप्रमाणे असेल.
- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम ( i-क & i-ख ) प्रवर्गासाठी: भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा, २००६ च्या तरतुदींनुसार या प्रवर्गात येणारे सदस्य, तसेच त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारीत व्याख्येनुसार पात्र राहतील.

- महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण-२०२३ व त्यानुषंगाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार निर्यातीभिमुख विशिष्ट प्रकल्प (EOSP), निर्यातीभिमुख औद्योगिक उद्याने (EOIP) ची व्याख्या केली जाईल.

**३. उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद पुरस्कार प्रवर्गांतर्गत सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम उत्पादक निर्यातदारांसाठी खालील प्रत्येक उत्पादन गटात पुरस्कार दिले जातील:-**

i. रत्ने आणि आभूषणे
ii. इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिकल्स
iii. अभियांत्रिकी आणि ऑटोमोटिव्हज्
iv. रसायने आणि संबंधित उत्पादने (काच आणि मातीची भांडी, रंग आणि वार्निश, कागद आणि कागद उत्पादने, लाकूड आणि लाकूड उत्पादने, रबर आणि रबर वस्तू इ .)
v. औषधनिर्माण आणि सौंदर्यप्रसाधन उत्पादने
vi. प्लास्टिक आणि प्लास्टिक उत्पादने
vii. लोखंड आणि पोलाद
viii. वस्त्र आणि पोशाख (apparel), चामड्यांची उत्पादने
ix. कृषी प्रक्रिया, मत्स्यपालन आणि सागरी उत्पादने (मांसासह)

**४. सेवा पुरवठादार / सेवा निर्यातदार:-**

ज्या घटकांचे मुख्यालय महाराष्ट्र राज्यात स्थापित आहे व ज्यांच्या सेवांमुळे परकीय चलन प्राप्त होते, असे सेवा प्रदाते आणि सेवा निर्यातदार घटक सदर पुरस्कारासाठी पात्र राहतील. सदर निर्यात पुरस्काराची व्याप्ती वाढविण्यासाठी सेवा निर्यातदार प्रवर्गांतर्गत खालील क्षेत्रांचा समावेश करण्यात येत आहे :-

i. आयटी आणि आयटीईएस
ii. पर्यटन
iii. आदरातिथ्य आणि वेलनेस
iv. शैक्षणिक क्षेत्र
v. पायाभूत सुविधा आणि बांधकाम
vi. फिनटेक आणि बीएफएसआय
vii. मीडिया आणि मनोरंजन

**५. प्रवर्गनिहाय राज्य निर्यात पुरस्कारांची संख्या (प्रथम आणि द्वितीय पुरस्कारांसह) खालीलप्रमाणे आहे:-**

| अ. क्र | प्रवर्ग | पुरस्कार संख्या | |
|---|---|---|---|
| | | प्रथम | द्वितीय |
| १ | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम उत्पादक निर्यातदार | | |
| | क) सूक्ष्म आणि लघु उपक्रम | ९ | ९ |
| | ख) मध्यम उपक्रम | ९ | ९ |
| २ | व्यापारी निर्यातदार (मर्चंट एक्सपोर्ट) /निर्यात गृह (एक्सपोर्ट हाऊस) /व्यापार गृह (ट्रेडींग हाऊस) | १ | १ |
| ३ | सेवा पुरवठादार/सेवा निर्यातदार | ७ | ७ |
| ४ | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम उत्पादक निर्यातदार (सामाजिक प्रवर्गानुसार) | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | क) महिला | १ | १ |
| | ख) अनुसूचित जाती | १ | १ |
| | ग) अनुसूचित जमाती | १ | १ |
| ५ | बिगर अभियांत्रिकी (नॉन-इंजिनिअरिंग), एक जिल्हा एक उत्पादन (ओडीओपी) आणि भौगोलिक मानांकन (जीआय) उत्पादक निर्यातदार | १ | १ |
| ६ | सर्वोत्कृष्ट निर्यातिभिमुख विशिष्ट प्रकल्प (EOSP)/निर्यातीभिमुख औद्योगिक उद्याने (EOIP)/विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) | १ | - |
| ७ | संस्थात्मक पुरस्कार | | |
| | क) सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्याकरीता पुरस्कार | १ | १ |
| | ख) सर्वोत्कृष्ट जिल्हा निर्यात कृती आराखडा (DEAP) | १ | १ |
| | ग) सर्वोत्कृष्ट निर्यात प्रोत्साहन परिषद (EPC) | १ | - |
| | **एकूण** | **३४** | **३२** |

**६. राज्य निर्यात पुरस्काराचे स्वरुप:-**

i. प्रथम पुरस्कार:- रुपये ५१,०००/- (धनादेश) व प्रशस्ती पत्र
ii. द्वितीय पुरस्कार:-रुपये २५,०००/-(धनादेश) व प्रशस्ती पत्र
iii. संस्थात्मक पुरस्कार:- प्रशस्ती पत्र

**७. राज्य निर्यात पुरस्काराकरीता पात्रता निकष:-**

i. परिच्छेद-२ मधील i ते vi येथे नमूद पुरस्काराकरीता पात्रता निकष:-

क) परकीय चलनाच्या बाबतीत निर्यातीचे एकूण FOB (Free on Board) मूल्य किमान रुपये २ कोटी असणारे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक पात्र असतील.

ख) निर्यातीचे उत्पादनाशी गुणोत्तर.

ग) निर्यातीचा कल (वाढणारा किंवा कमी होणारा).

घ) पूर्वी निर्यात न झालेल्या उत्पादनासाठी बाजारपेठ विकसित करणे.

ङ) निर्यात बाजारात नवीन उत्पादनांची निर्यात.

च) जिथे परिस्थिती विशेषतः कठीण आहे अशा परदेशी बाजारपेठेत यशस्वी पर्दापण.

छ) हरित उपक्रमाचा अवलंब - अक्षय ऊर्जेचा वापर आणि कचरा कमी करणे यासह पर्यावरणीयदृष्ट्या जबाबदार कार्यपध्दतीचा अवलंब करणाऱ्यांना प्रोत्साहन देणे.

**ii. परिच्छेद-२ मधील vii येथे नमूद संस्थात्मक पुरस्कारांसाठी पात्रता निकष:-**

**क) सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्याकरीता पुरस्कार:-**

अ. मागील तीन वर्षांत जिल्ह्यात झालेल्या आयईसी (आयातदार-निर्यातदार क्रमांक) नोंदणी संख्या.

आ. परकीय चलनाच्या बाबतीत जिल्ह्याचे एकूण एफओबी (फ्री ऑन बोर्ड) निर्यात मूल्य.

इ. जिल्ह्यात हाती घेतलेल्या नवीन निर्यात प्रोत्साहन उपक्रमांची संख्या.

ई. जिल्ह्यात घेतलेल्या निर्यात प्रोत्साहन कार्यक्रमांची संख्या व सहभागीदारांची संख्या.

**ख) सर्वोत्कृष्ट जिल्हा निर्यात कृती आराखडा (District Export Action Plan/DEAP):-**

अ. पुरस्कार कालावधीत झालेल्या जिल्हा निर्यात प्रोत्साहन समिती ( DEPC) बैठकांची संख्या.

आ. अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उद्दिष्टांवर आधारित जिल्हा निर्यात प्रोत्साहन समिती (DEPC) मध्ये निर्यात प्रोत्साहन धोरणाचे वर्गीकरण समाविष्ट करणे.

इ. जिल्हा निर्यात कृती आराखडा (DEAP) मध्ये जिल्ह्यात घेण्यात आलेल्या निर्यात प्रोत्साहन उपक्रमांचा समावेश.

ई. जिल्हा निर्यात कृती आराखडा (DEAP) मध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्दिष्ट वर्षासाठी नियोजित एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) उपक्रम.

**ग) सर्वोत्कृष्ट निर्यात प्रोत्साहन परिषद** (Export Promotion Council/EPC):-

अ. मागील तीन वर्षांत नोंदणीकृत सदस्य निर्यातदारांच्या संख्येतील वाढ.

आ. पुरस्कार वर्षात घेतलेल्या निर्यात प्रोत्साहन उपक्रमांची संख्या व उपस्थित असलेल्या सहभागीदारांची संख्या.

इ. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या कार्यक्रमांची संख्या, तसेच प्रतिनिधी मंडळाची संख्या.

ई. निर्यातदारांचे प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीसाठी हाती घेतलेल्या उपक्रमांची संख्या.

**०८. राज्य निर्यात पुरस्कारासाठी प्राप्त अर्ज खालील कागदपत्रांच्या अभावी नाकारले जातील:-**

i. नमूद अंतीम तारखेपूर्वी विहित नमुन्यात अर्ज सादर केला नसेल.

ii. अपूर्ण माहिती दिली असेल.

iii. मागील तीन वर्षांचे (पुरस्कार वर्षासह) उत्पादनाचे पुस्तकी मूल्य (Book value) आणि निर्यातीचे एफओबी मूल्य सनदी लेखापाल (सीए) द्वारे प्रमाणित केलेले नसेल.

iv. सूक्ष्म व लघु घटक (SME) /निर्यात गृह (EH) /व्यापारी निर्यातदार(ME) /व्यापार गृह(TH) / सेवा निर्यातदार (SE) इत्यादी प्रवर्ग अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद केले नसतील.

v. अर्जासोबत उत्पादक निर्यातदारांच्या बाबतीत वैध SME/DGTD/RCMC नोंदणी/प्रमाणपत्राची प्रत आणि निर्यात गृहांच्या बाबतीत मान्यता प्रमाणपत्राची प्रत नसेल.

vi. कोणत्याही अर्जदाराला एका पुरस्कार वर्षात एकापेक्षा जास्त पुरस्कार दिले जाणार नाहीत.

vii. सलग तीन वर्षे पुरस्कार मिळालेले अर्जदार अपात्र मानले जातील. तथापि, अपवादात्मक प्रकरणांमध्ये, पात्रतेबाबतचा अंतिम निर्णय निवड समितीचा असेल.

**०९. गुणांकनाची प्रक्रिया:-**

एकूण १०० गुणांपैकी, उद्योग संचालनालयांतर्गत निर्यात प्रोत्साहन शाखेमार्फत परिच्छेद क्र. ०७ (i) - 'क', 'ख' आणि 'ग' मध्ये निर्दिष्ट केलेल्या निकषांसाठी (पॅरामीटर्स) ८० गुण देण्यात येईल. सदर प्रयोजनार्थ गठीत करण्यात येणाऱ्या निवड समितीमार्फत निर्यातदारांनी स्वीकारलेल्या हरित उपक्रमांच्या आधारावर, पूर्वी निर्यात न केलेल्या उत्पादनांसाठी बाजारपेठ विकासासाठी प्रयत्न, निर्यात बाजारात नवीन उत्पादनांची निर्यात आणि नवीन आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचा शोध यावर आधारित उर्वरीत २० गुण देण्यात येईल. गुण वाटपाचे निकष पुढील परिच्छेद १० मध्ये नमूद केले आहेत. महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३ नुसार, झोन १ मधील निर्यातदारांसाठी पात्रतेकरीता एकूण ६० गुण, झोन ll साठी एकूण ५० गुण आणि झोन lll साठी एकूण ४० गुण असतील.

संस्थात्मक पुरस्काराचे मूल्यांकन ५० गुणांमधून केले जाईल. सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांकरीता पुरस्कार आणि सर्वोत्कृष्ट निर्यात प्रोत्साहन परिषद (EPC) साठी निर्यात प्रोत्साहन शाखेकडून परिच्छेद क्र. ७ (ii) (क) व (ग) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निकषांच्या (पॅरामीटर्स) आधारे गुणांकन करण्यात येईल. गुणांकनाचे तपशीलवार निकष परिच्छेद क्र. १० मध्ये दिलेले आहेत.

सर्वोत्कृष्ट जिल्हा निर्यात कृती आराखडा (DEAP) चे मूल्यांकन वस्तुनिष्ठ असेल आणि जिल्ह्याने सादर केलेल्या जिल्हा निर्यात कृती आराखड्यावर (DEAP) आधारित असेल, ज्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेली असेल. या पुरस्काराचे वस्तुनिष्ठ स्वरूप लक्षात घेता, अंतिम निर्णय निवड समितीचा असेल.

१०. गुणांकनाचे निकष:-

i. **परिच्छेद क्र. २ मधील i ते vi येथे नमूद पुरस्काराकरीता गुणांकन:-**

| गुणांकनासाठी निकष | MSME उत्पादक निर्यातदार, MSME उत्पादक निर्यातदार (सामाजिक श्रेणीसाठी), (नॉन-इंजिनिअरिंग, ओडीओपी, जीआय) उत्पादक निर्यातदार आणि EOSP/EOIP/SEZ. | व्यापारी निर्यातदार/निर्यात गृह/ व्यापार गृह, सेवा निर्यातदार |
|---|---|---|
| जास्तीत जास्त निर्यात | ४० | ६० |
| निर्यात आणि उत्पादनाचे गुणोत्तर | २० | - |
| निर्यातीतील सर्वोत्तम कल | २० | २० |
| नवीन उत्पादन | ७ | ७ |
| नवीन बाजार | ७ | ७ |
| हरित उपक्रम | ६ | ६ |
| **एकूण** | **१०० गुण** | **१०० गुण** |

ii. **परिच्छेद क्र. २ (vii) येथे नमूद संस्थात्मक पुरस्कारांसाठी गुणांकन:-**

क) सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्याकरीता पुरस्कार:-

| **गुणांकनाचे निकष** | **गुण** |
|---|---|
| आयईसी (आयातदार-निर्यातकर्ता कोड) नोंदणीचा ट्रेंड | १५ |
| एकूण एफओबी (फ्री ऑन बोर्ड) निर्यात मूल्य | १५ |
| नवीन निर्यात प्रोत्साहन उपक्रमांची संख्या* | १० |
| निर्यात प्रोत्साहन कार्यक्रमांची संख्या* | १० |
| **एकूण** | **५० गुण** |

*(* टीप:- निर्यात कार्यक्रम आणि उपक्रमांची संख्या समान असल्यास, या कार्यक्रमांमधील एकूण सहभागी उपस्थितीच्या आधारे निर्णय घेतला जाईल.)*

ख) सर्वोत्कृष्ट जिल्हा निर्यात कृती आराखडा (DEAP):-

| **गुणांकनाचे निकष** | **गुण** |
|---|---|
| जिल्हा निर्यात प्रोत्साहन समिती (DEPC) च्या झालेल्या बैठकांची संख्या | १५ |
| जिल्हा निर्यात कृती आराखडयामध्ये (DEAP) निर्यात धोरणाचे अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उद्दिष्टांनुसार वर्गीकरण. | १५ |
| निर्यात प्रोत्साहन उपक्रमांसाठी सविस्तर आराखड्याचा समावेश | १० |
| ODOP नियोजित उपक्रम | १० |
| **एकूण** | **५० गुण** |

ग) सर्वोत्कृष्ट निर्यात प्रोत्साहन परिषद (EPC):-

| **गुणांकनाचे निकष** | **गुण** |
|---|---|
| नोंदणीकृत सदस्य निर्यातदारांच्या संख्येत वाढ | २० |
| निर्यात प्रोत्साहन उपक्रमांची संख्या* | १० |

| | |
|---|---|
| राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या कार्यक्रमांची संख्या* | १० |
| निर्यातदार प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीसाठी हाती घेतलेल्या उपक्रमांची संख्या* | १० |
| **एकूण** | **५० गुण** |

*(* टीप:- निर्यात कार्यक्रम आणि उपक्रमांची संख्या समान असल्यास, या कार्यक्रमांमधील एकूण सहभागी उपस्थितीच्या आधारे निर्णय घेतला जाईल.)*

**११. गुणांकन आणि पुरस्कार विजेत्यांच्या निवडीसाठी निकष:-**

विविध निर्यातदारांकडून प्राप्त झालेले सर्व अर्ज वेगवेगळ्या प्रवर्ग आणि उत्पादन क्षेत्र (कमोडिटी) गटांनुसार निश्चित केले जातील. त्यानंतर उत्पादन क्षेत्र (कमोडिटी) गटांना गुणांकन केले जातील.

**क) महत्तम निर्यातीच्या आधारावर (निरपेक्ष) - एकूण ४० गुण**

पुरस्कार वर्षातील विशिष्ट गटातील FOB मधील कमाल निर्यात मूल्याच्या आधारावर वैयक्तिक निर्यातदाराच्या FOB मधील निर्यात मूल्य गणले जातील.

उदाहरणार्थ, जर एका विशिष्ट प्रवर्गामध्ये १५ निर्यातदार असतील, तर ज्या निर्यातदाराची जास्तीत जास्त निर्यात आहे त्याला पूर्ण ४० गुण मिळण्यास पात्र असेल. या कमाल FOB निर्यात मूल्याचा आधार विचारात घेऊन उर्वरित घटकांना त्यांच्या निर्यात मूल्याच्या प्रमाणानुसार गुण दिले जातील. म्हणजेच जर कमाल FOB निर्यात मूल्य १५ लाख रुपये असेल आणि पुढील निर्यातदार, ज्याचे निर्यात मूल्य १२ लाख रुपये असेल, तर त्या घटकाला ३२ (१२/१५ x ४० = ३२) गुण दिले जातील आणि अशा प्रकारे सर्व घटकांना (पर्सेंटाइल) गुण दिले जातील.

संस्थात्मक पुरस्कारांसाठीही अशाच प्रकारे (पर्सेंटाइल) गुणांकनाची पद्धत स्वीकारली जाईल.

**ख) निर्यात आणि उत्पादनाचे गुणोत्तर - एकूण २० गुण**

उत्पादन आणि निर्यात मूल्याच्या आधारावर, उत्पादक निर्यातदारांच्या बाबतीत, एका विशिष्ट प्रवर्गातील सर्व निर्यात करणाऱ्या घटकांचे निर्यात आणि उत्पादनाचे गुणोत्तर काढले जातील. निर्यात उत्पादन गुणोत्तर जास्तीत जास्त असलेल्या घटकाला २० गुण देण्यात येतील. निर्यात उत्पादन गुणोत्तर सर्वाधिक असल्याने, उर्वरित घटकांना त्यांच्या निर्यात उत्पादन गुणोत्तराच्या प्रमाणात गुण दिले जातील. उदा. निर्यात उत्पादन गुणोत्तर सर्वाधिक असलेल्या निर्यातदाराला आधार १ पकडून पूर्ण २० गुण दिले जातील. निर्यात उत्पादन गुणोत्तर ०.८ असलेल्या पुढील निर्यातदाराला, ०.८ म्हणून, १६ (०.८/१ x२० = १६) गुण दिले जातील आणि असेच पुढेही केले जातील.

**ग) निर्यातीचा कल (ट्रेंड) - एकूण २० गुण**

मागील ३ वर्षांच्या निर्यात मूल्याच्या आधारावर (पुरस्कार वर्षासह), निर्यातीचा कल (वाढत आहे/कमी होत आहे) मोजला जाईल आणि सर्वाधिक वाढत्या कल (ट्रेंड) असलेल्या घटकाला पूर्ण २० गुण दिले जातील. या सर्वोच्च वाढीचा आधार म्हणून विचारात घेऊन, उर्वरित घटकांना त्यांच्या कलानुसार (ट्रेंड) गुण दिले जातील उदा. १००% सरासरी वाढीचा ट्रेंड असलेल्या निर्यातदाराला पूर्ण २० गुण दिले जातील आणि ८०% सरासरी वाढीचा ट्रेंड असलेल्या पुढील निर्यातदाराला १६ (८०/१०० x २० = १६) गुण दिले जातील आणि अशाप्रकारे पुढील गुणांकन केले जातील. घटता कल (निगेटीव्ह ट्रेंड) असलेल्या निर्यातदाराला शून्य गुण दिले जातील. संस्थात्मक पुरस्कारांसाठीही अशाच प्रकारे (पर्सेंटाइल) गुणांकन केले जाईल.

सर्व प्रवर्गामध्ये ३ निकषांच्या (पॅरामीटर्स) च्या आधारे १०० गुणांपैकी ८० गुणाच्या बाबतीत निर्यात प्रोत्साहन शाखेमार्फत गुणांकन केल्यानंतर, निर्यात कामगिरीची माहिती दर्शविणारा गुणांकन तक्ता तयार केला जाईल. तद्नंतर निवड समितीमार्फत पूर्वी निर्यात न केलेल्या उत्पादनासाठी बाजारपेठ विकसित करण्यासाठी, नवीन

आंतरराष्ट्रीय बाजारपेठ (वेगवेगळ्या देश/खंडातील) शोधण्यासाठी केलेले प्रयत्न आणि हरित उपक्रमांसाठी करण्यात आलेले प्रयत्न या आधारावर निर्यातदारांना जास्तीत जास्त २० गुण दिले जातील. अशा प्रकारे १०० गुणांपैकी विवरण तक्ता तयार करण्यात येईल. तसेच संस्थात्मक पुरस्कारांसाठी सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्याकरीता पुरस्कार, सर्वोत्कृष्ट जिल्हा निर्यात कृती आराखडा (DEAP), सर्वोत्कृष्ट निर्यात प्रोत्साहन परिषद (EPC) या प्रवर्गासाठी प्रत्येकी ५० गुणांपैकी विवरण तक्ता तयार करण्यात येईल व अंतिम प्रस्ताव निवड समितीकडे सादर केला जाईल.

**१२. निवड समिती:-** राज्य निर्यात पुरस्कार निवडीसाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १ | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव (उद्योग) | अध्यक्ष |
| २ | विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय | उपाध्यक्ष |
| ३ | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव (कृषी) | सदस्य |
| ४ | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव (पणन) | सदस्य |
| ५ | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव (सामाजिक न्याय) | सदस्य |
| ६ | अतिरिक्त संचालक, डायरेक्टरेट जनरल ऑफ फॉरेन ट्रेड (DGFT), मुंबई प्रदेश | सदस्य |
| ७ | प्रादेशिक प्रमुख, फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशन्स (FIEO), पश्चिम विभाग, मुंबई | सदस्य |
| ८ | वरिष्ठ उपसंचालक, इंजिनिअरिंग एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल इंडिया (EEPC) | सदस्य |
| ९ | संचालक, प्लास्टिक आणि लिनोलियम निर्यात प्रोत्साहन परिषद, मुंबई. | सदस्य |
| १० | संचालक, केमिकल, फार्मास्युटिकल व एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल. | सदस्य |
| ११ | संचालक, कॉटन टेक्सटाइल एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल, मुंबई | सदस्य |
| १२ | संचालक, सेवा निर्यात प्रोत्साहन परिषद (SEPC) | सदस्य |
| १३ | उपमहाव्यवस्थापक, अपेडा, मुंबई | सदस्य |
| १४ | संचालक, ॲपरल्स एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल, मुंबई | सदस्य |
| १५ | उद्योग सह संचालक (निर्यात)/अधिक्षकीय उद्योग अधिकारी (निर्यात), उद्योग संचालनालय, मुंबई | सदस्य सचिव |

पुरस्कार निवडीच्या अनुषंगाने सदर समितीचा निर्णय अंतिम राहील आणि सदर निर्णय सर्व निर्यातदारांवर बंधनकारक असेल. त्याबाबत समिती कोणतेही अपील दाखल करुन घेणार नाही.

**१३.** सदर कार्यक्रमासाठी होणारा खर्च " मागणी क्र.के-७, २८५२-उद्योग, १०४-औद्योगिक प्रोत्साहन, (०१)(०१) निर्यातक्षम घटकांसाठी विशेष प्रोत्साहन (कार्यक्रम) (२८५२ ए०८७), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली भागविण्यात यावा.

**१४.** सदर कार्यपध्दती ही यापुढे वितरीत करण्यात येणाऱ्या राज्य निर्यात पुरस्कार कार्यक्रमांकरिता अनुसरण्यात येईल. तसेच सदर कार्यपध्दतीच्या अनुषंगाने अर्जांचे/परिशिष्टांचे नमुने सोबत जोडले आहेत.

**१५.** राज्य निर्यात पुरस्कार वितरणाच्या अनुषंगाने पुरस्काराच्या स्वरूपामध्ये करण्यात आलेली सुधारणा ही महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण-२०२३ मध्ये केलेल्या तरतूदीनुसार करण्यात येत आहे.

१६.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२६०६१५१५५५४३७२३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TUKARAM SASULKAR

Digitally signed by AJIT TUKARAM SASULKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD,
2.5.4.20=09DF106C443B4977E7463338FA58F736FDB4FE137863B1783
45A5EAD34DBFB12, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=71214F99804ABAAE1EA28D5F794C1BA337889880D0C5
67C29D025934340956DF, cn=AJIT TUKARAM SASULKAR
Date: 2026.06.15 15:55:48 +05'30'

**(अजित सासुलकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सा.बां.वि.(साउ)) यांचे प्रधान सचिव
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभाग) यांचे प्रधान सचिव
५. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
६. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
७. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
८. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१०. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व विभाग)
११. विभागीय आयुक्त, कोकण विभाग/छत्रपती संभाजीनगर विभाग/पुणे विभाग/नाशिक विभाग/अमरावती विभाग/नागपूर विभाग.
१२. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१३. अतिरिक्त विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ, मुंबई.
१७. सर्व जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
१८. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या नियंत्रणाखालील महामंडळे/शासकीय उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी. (उद्योग संचालनालयामार्फत)
१९. उद्योग सह संचालक/अधिक्षकीय उद्योग अधिकारी, मुंबई प्राधिकरण विभाग/कोकण विभाग/पुणे/ नाशिक/ अमरावती/ छत्रपती संभाजीनगर/ नागपूर. (उद्योग संचालनालयामार्फत)
२०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (सर्व) (उद्योग संचालनालयामार्फत)
२१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२३. अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२४. वित्त विभाग (व्यय-१६/अर्थ-१४), मंत्रालय, मुंबई-३२.
२५. नियोजन विभाग (योजना-१४६१), मंत्रालय, मुंबई-३२.
२६. कक्ष अधिकारी (प्रशासन-१), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२७. निवड नस्ती (उद्योग-७), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**परिशिष्ट (Annexures)**

**Annexure-I : Application for Maharashtra State Export Award**

| **Annexure-I** | | |
|---|---|---|
| **Details required in Application** (Please tick appropriate) | | |
| 1 | **Name of Enterprise/ Units** | |
| 2 | **Name of Managing Director/Proprietor/Partner/Applicant** | |
| 3 | **Address of the Enterprise/ Unit**<br>a) Year of establishment | |
| | b) Location Address of the unit | |
| | c) Address for communication | |
| | d) Telephone | |
| | e) Email | |
| 4 | **Contact Person of the Enterprise**<br>a) Name : | |
| | b) Designation : | |
| | c) Mobile No: | |
| | d) Email : | |
| 5 | **Products/Commodity/Service Exported & HSN code**<br>(2 digits) | ☐ |
| 6 | **Importer and Exporter Code(IEC Code No.)**<br>(Please enclose a self-certified copy) | ☐ |
| 7 | **GST registration No./Artisan ID No**<br>(Please enclose a self-certified copy) | ☐ |
| 8 | **Udyam Registration No.**<br>(Please enclose a self-certified copy) | ☐ |
| 9 | **Registration details with the Export Promotion Councils** (Please enclose a self-certified copy) | ☐ |
| **10.** | **Type, Category of the Manufacturing Enterprises/Unit, Product/ Service Category of Enterprises** (Please tick appropriate) | |
| **10.1.** | **MSME Manufacturer Exporter** | |
| | a. Micro / Small | ☐ |
| | b. Medium | ☐ |
| **10.2** | c. Merchant Exporter/Export House/ Trading House | ☐ |
| **10.3** | d. Service Exporter | ☐ |
| **10.4** | **MSME Award for Social Category (Manufacturer Exporter)** | |
| | a. Women * | ☐ |
| | b. Scheduled Caste * | ☐ |
| | c. Scheduled Tribe * | ☐ |
| **10.5** | **Non-Engineering ODOP & GI Exporter** | |
| **10.6** | Green initiative in manufacturing unit (if Yes, submit enclosure "D") | ☐ |
| **11.** | **Product Category- Only for MSME Manufacturer Exporter**<br>(Please tick the relevant) | |
| | i. Gems & Jewellery | ☐ |
| | ii. Electronics & Electricals Products | ☐ |
| | iii. Engineering & Automotive | ☐ |
| | iv. Chemicals & Allied Products (Basic Chemicals, glass and ceramics, paints and varnishes, paper and paper products, wood and wood products, rubber and rubber goods, etc) | ☐ |
| | v. Pharmaceuticals & Cosmetics products | ☐ |

| | | | |
|---|---|---|---|
| | vi. Plastic & Plastic Products | | |
| | vii. Iron & Steel | | |
| | viii. Textiles & apparels including leather products | | |
| | ix. Agro Processing, Fisheries & Marine products (Including Meat) | | |
| | **Service Exporter** | | |
| | i. IT & ITeS | | |
| | ii. Tourism | | |
| | iii. Hospitality & Wellness | | |
| | iv. Educational Sector | | |
| | v. Infra & Contradiction | | |
| | vi. Fintech & BFSI | | |
| | vii. Media & Entertainment | | |

| **12.** | **Actual Production (Total Turnover) :** (Submit in separate copy on the letterhead of CA) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| No | Item | II year prior to year of award | | I year prior to year of award | | *Year of award* | |
| | | Quantity | Value (Rs.) | Quantity | Value (Rs.) | Quantity | Value (Rs.) |
| (i) | | | | | | | |

Note : The production figures should be supported with a Charted Accountant's Certificate

**Please Note That the CA Certificate unique Documents Identification No. (UDIN) & firm registration number (FRN) along with signature & seal of CA. any such CA Certificate without UDIN & FRN will be liable to be rejected. CA certificate will certify both export performance for the relevant year and total turnover of the organization for the same year (3 Years)**

| **13.** | **Export Performance** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Items Exported | II year prior to year of award | | I year prior to year of award | | **Year of award** | |
| | Quantity | F.O.B (Rs. in Cr.) | Quantity | F.O.B (Rs. in Cr.) | Quantity | F.O.B (Rs. in Cr.) |
| | | | | | | |

**Note :** (i) **The figures should relate to the financial year (April-March) ending on 31st March.**

(ii) The export figures should be supported with Bank Certificate. If Bank Certificate is not available, certificate from Charted Accountant and the concerned Export Promotion Council should be attached.

(iii) Manufacturer Exporters should give separate figures for direct exports in their name only and indirect exports through Export Houses/Merchant Exporters.

(iv) The exporter shall submit the Bank Foreign Invert Remittance Certificate.

**14. Country wise break up of Exports during 3 years.**
(Please attach separate sheet for different commodities)

| Country | F.O.B. value of items exported (in Rs.) | | |
|---|---|---|---|
| | II year prior to year of award | I year prior to year of award | Year of award |
| | | | |

**15. Ratio of Exports to production (Percentage)** (To be filled in by manufacturer exporters).

| Year | | Value of production (Book Value) (A) Rs. in Cr. | Exports (F.O.B. Value) (B) Rs. in Cr. | Percentage (ratio) =B/A $\times$100 |
|---|---|---|---|---|
| 1 | II year prior to year of award | | | |
| 2 | I year prior to year of award | | | |
| 3 | Year of award | | | |

**16.** In case of Merchant Exporters/Export House, please give State wise lists of associate units whose products are exported (Attach separate sheets).

**17.** In case of indirect exports by Manufacturer Exporters, Please give the list of Merchant Exporters/Export Houses in India through whom the products are exported.

**18.** Details of Export Promotional efforts with reference to the following:-

(a) Development of market abroad for a product which had not been previously exported.
(b) Successful break-through in new foreign markets for existing export products.
Market surveys which led to significant increase in export trade.

**19.** Whether the exporting firm ever had any occasions to resort to arbitration proceedings in respect of disputes with foreign importers for any other reasons? If yes, the details thereof may be given. If not, a certificate from the concerned Export Promotion Council may be enclosed.

A. To substantiate classification as Micro, Small & Medium Enterprises, the applicants are mandatorily required to submit one or more relevant pages of balance sheet with details of investment & plant & machinery as on 31$^{st}$ March (Award Year) duly certified by CA with UDIN & FRN registration number (FRN) along with signature & seal of CA. for this unit has to submit investment in plant & machinery (Gross Block) for the year (Award Year)

B. In the event of any award offered to any exporter is found to be inappropriate, Award Committee will decide for corrective action. In the reverse case that is if award application found to be incorrect after the award is offered, award committee will request for withdrawal of award.

## DECLARATION

We hereby certify that the information furnished in this form is authentic and correct and we shall abide by the decision of the Directorate of Industries.

Signature Name

Designation

---

Name of the firm (With rubber stamps)

N.B. :- Information should be completed in all respects and should be accompanied by all relevant documents, as per Annexure-II'

Incomplete forms in any respect , may not be considered.

**Annexure II: LIST OF ACCOMPANIMENTS OF APPLICATION**

1. Attested copy of valid Micro, Small, Medium Entrepreneur Memorandum.
2. Value of production (Book Value) and Value of Export (FOB Value) for last three financial years of the year of award ending on (31st March) duly certified by the Chartered Accountant/Cost Accountant with unique Documents Identification No. (UDIN) & firm registration number (FRN) along with signature & seal. Any such CA Certificate without UDIN & FRN will be liable to be rejected. CA certificate will citified both export performance for the relevant year and total turnover of the organization for the same year (3 Years), GSTR-1, GSTR-9
3. Certification by the concerned Export Promotion Council for validity of Registration cum Membership Certificate issued to the exporter.
4. Copy of valid recognition certificate as Export House/Trading House/ Merchant Exporters certified by FIEO.
5. Copy of Valid Import- Export Code (IEC) certificate.
6. Copy of Valid SC-ST validity certificate. ( for SC-ST unit)
7. Declaration on letterhead of the company duly signed by authorised signatory regarding "Working Status" of unit. (as per annexure III.)
8. Certificate of concerned Export Promotion Council for non receipt of any complaint/ disputes of overseas buyer regarding supply of goods by the exporter. (as per Annexure-IV)
9. Declaration of Green Initiative, (As per Annexure- V)

**Annexure III:**

DECLARATION

**(To be furnished on the letterhead of the applicant unit)**

We hereby declare that our unit is not closed due to sickness/strike/lock out etc. and stopped production / export during the current year. We further declare that our registration certificate as Micro, Small, Medium, Enterprises/SIA is valid till date and was neither cancelled nor with held in past.

**Place:-** **Signature of applicant**

**Date:-** **Name & Designation**

**Annexure IV:**

(Certificate from concerned EPC on the letterhead)

To whomsoever it may concern

1. This is to certify that M/s.--------- are registered member of the council as ---------- for export of -------. Their RCMC No. is ---------- and is valid upto -------------
2. It is further certified that the Industrial unit/Export House has developed following new product/market for the export in the year ---------------

    1. New Product ------------
    2. New Market ------------

3. We find from our records that the industrial unit/export house never had any occasion to report to Arbitration proceeding in respect of the dispute with their overseas buyers.

   This certificate is issued based on the records available with us.

**Place:-** **Authorized Signatory**

**Date:-** **Export Promotion Council**

**Annexure V:**

(Green initiative certificate from MSEB & MPCB on their letterhead.)

This is to certified that M/s…….. has taken green initiative in the manufacturing process.

**Place:-** **Authorized Signatory**

**Date:-** **MSEB/MPCB**

**********************************************************************************